# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ८८ /२०२३ दि. २१/०४/२०२३

## "वाहतूक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी,** ठाणे शहरातील राबोडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि. २२/०४/२०२३ रोजी दुपारी १२:०० वा. जिल्हा सामान्य रूग्णालय, ठाणे व सुपर स्पेशालिटी रूग्णालयाच्या नूतन इमारतीच्या बांधकामाचा भुमीपूजन सोहळा आहे. सदर भुमीपूजल सोहळयास मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा. उप मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, मा. आरोग्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केलेला असून मा. केंद्रीय मंत्री, मा. बांधकाम मंत्री, मा. पालकमंत्री, ठाणे जिल्हा तसेच ठाणे जिल्हयातील लोकसभा, विधानसभा, विधान परिषद सदस्य व इतर मान्यवर तसेच सर्वसामान्य नागरिक यांचे उपस्थितीत संपन्न होणार आहे. सिव्हील हॉस्पिटल कॉर्नर येथे रोड अरूंद असल्याने सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे.

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | १) कोर्ट नाका कडून जी. पी. ओ., सिव्हील हॉस्पिटल कॉर्नर कडून जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना कोर्ट नाका येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने कोर्ट नाका, टॉवर नाका चौक मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | २) डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, सिव्हील हॉस्पिटल कॉर्नर, जी. पी. ओ. मार्गे कोर्ट नाका कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना सिव्हील हॉस्पिटल कॉर्नर येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने सिव्हील हॉस्पिटल कॉर्नर, टेंभी नाका, कोर्ट नाका मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | ३) ठाणे रेल्वे स्टेशन कडून टॉवर नाका, टेंभी नाका, सिव्हील हॉस्पिटल मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक कडे जाणाऱ्या टीएमटी, एस.टी. व खाजगी बसेसना टॉवर नाका येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने टॉवर नाका, गडकरी सर्कल, अल्मेडा चौक मार्गे इच्छित स्थळी जातील. |

सदरची वाहतूक अधिसूचना ही दि. २२/०४/२०२३ रोजी सकाळी ११.०० वा. पासून सदर कार्यक्रम संपेपर्यंत अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी. ठाणे

CamScanner

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१/वि.शा. ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे,
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे,
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे.

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व पो.निरी. नौपाडा, ठाणेनगर, कळवा, राबोडी, वाहतूक उपविभाग ठाणे.

CamScanner